Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- (CCXCIX) 299

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- (CCXCIX) 299

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati
Website – www.aadharsocial.com Email – aadharsocial@gmail.com.

| | | |
|---|---|---|
| 20 | यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक कार्ये डॉ.आर.व्ही. मोरे | 73 |
| 21 | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य **प्रा.डॉ.बालाजी परबतराव खराबे** | 77 |
| 22 | यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचे महत्त्वपूर्ण योगदान **डॉ.ज्योती रामराव रामोड** | 81 |
| 23 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान सौ.सुगंधा परेश जाधव | 84 |
| 24 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सहकार विषयक विचार **डॉ.नवनाथ गोविंदराव अडकिणे** | 88 |
| 25 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका प्रा.डॉ.देवर्षी मुकुंद अरविंद | 91 |
| 26 | यशवंतराव चव्हाण यांच्या अर्पणपत्रिकेतील वेणूताई विषयीची कृतज्ञता **प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे** | 97 |
| 27 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान **प्रा.मनोज बबनराव देवकर** | 100 |
| 28 | राजकीय सामाजिकरणातून घडलेले नेतृत्व – यशवंतराव चव्हाण प्रा.डॉ.सुपेकर वैशाली प्रशांत | 103 |
| 29 | व्दैभाषिक राज्यातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान प्रा.सांगळे भाऊसाहेब खंडु | 107 |
| 30 | यशवंतराव चव्हाणांचे ग्रामिण सामाजिक विकासामधील योगदान प्रा.बी.एच.चौगुले | 109 |
| 31 | यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य सचिन सहादू घायतडके | 114 |
| 32 | 'यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक क्षेत्रातील कार्य प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी | 117 |
| 33 | महाराष्ट्राचे भाग्यविधाता मा. यशवंतराव चव्हाण डॉ संजय गोपाळराव ठवळे | 121 |
| 34 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य एक अभ्यास डॉ.जयदीप रा.सोळुंके | 125 |
| 35 | यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य कर्तृत्वावर भारतीय स्वातंत्र्य लढयाचा प्रभाव प्रा. डी. एन. रिठे | 129 |
| 36 | यशवंतराव चव्हाण यांची रसिकता व साहित्य चिंतन प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 132 |
| 37 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **डॉ.शिवाजी सोमला पवार** | 136 |
| 38 | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक व आर्थिक विचार डॉ. प्रतिमा बाळासाहेब कदम | 142 |
| 39 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान डॉ. संजय सागरु सपकाळ | 146 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 299 (CCXCIX)
ISSN : 2278-9308
July, 2021

# व्दैभाषिक राज्यातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

प्रा.सांगळे भाऊसाहेब खंडु
विभागप्रमुख,इतिहास विभाग,अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर(पुणे)
मो.–८८५०१९१०६८, ई मेल bksangale26@gmail.com

भारत आणि महाराष्ट्राच्या इतिहासात यशवंतराव चव्हाण यांचे कार्य भरीव स्वरूपाचे आहे.महाराष्ट्रातील प्रबोधनाची परंपरा त्यांच्या रूपाने बहुजन समाजात रुजलेली दिसून येते.आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय,सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक जीवनात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. महाराष्ट्राच्या विकासाला चालना दिली.यशवंतराव चव्हाण यांच्या हातात महाराष्ट्राची सूत्रे १९६० मध्ये आली.तेव्हा महाराष्ट्र एकसंघ नव्हता.द्वैभाषिक राज्याची निर्मिती झाल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून त्यांना अनेक आव्हानाला सामोरे जावे लागले.पुढे १९५५-५६ चा फाजल अली यांचा भाषिक प्रांतरचनेचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीची निर्मिती झाली. प्रस्तुत शोधनिबंधात यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्तमहाराष्ट्रचळवळीतील योगदान अभ्यासण्यात येणार आहे.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या मागणीचा इतिहास -

१८९१ मध्ये केसरी वृत्तपत्राच्या अग्रलेखातून मराठी भाषिकांच्या राज्यावर पसंती व्यक्त करण्यात आली होती.१९१० ते १९१४ या काळात केसरीचे संपादक न.चि.केळकर यांनी मराठी भाषिक एकीकरणाचा घाट घातला होता.मराठी भाषिकांचे विभाग एकत्र करण्याची कल्पना जयपूरच्या विठ्ठल ताम्हनकर यांना द्यावे लागेल.विनोबा भावे,धनंजय गाडगीळ यांचा सुद्धा महाराष्ट्राच्या एकीकरणाला पाठिंबा होता. महाराष्ट्र धर्म या जर्नलमध्ये भावे यांनी महाराष्ट्र २५ जिल्ह्यात समाविष्ट व्हावा, अशी मागणी केली होती.२८ जानेवारी १९४० मध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली.त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राचे क्षेत्र आणि सीमा दाखवणारा नकाशा लक्ष्मण श्रीधर वाकणकर यांनी तयार केला.

२८ जुलै १९४६ रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद भरविली गेली.या परिषदेत संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली. यात शंकरराव देव,यशवंतराव चव्हाण,केशवराव जेधे,ना.ग.गोरे,एस.एम.जोशी इ.नेते उपस्थित होते.ही परिषद सर्व पक्षीय संघटना होती.डिसेंबर मध्ये नेमलेल्या दार कमिशनने अभ्यास करून सध्याच्या परिस्थितीत प्रांत रचना निर्माण करणे शक्य नाही असे संगितले.मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क अमान्य केला.१९५२ मध्ये स्वतंत्र आंध्रची निर्मिती झाल्यानंतर भाषिक तत्वावर प्रांतांची मागणी वाढू लागली.१० ऑक्टोबर १९५५ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्र व गुजरात यांचे संयुक्त राज्य आणि विदर्भाचे स्वतंत्र राज्य करण्याचा निर्णय घेतला,त्याला तीव्र विरोध करताना यशवंतराव चव्हाण म्हणाले,'मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रची मागणी एकमुखी आहे.राज्य पुनर्रचनाआयोगाने ही मागणी धुडकावून लावल्यामुळे महाराष्ट्रात निराशा आणि वैफल्य निर्माण झाले आहे'. या अहवालाविरूद्ध महाराष्ट्रातील नेत्यांनी कॉंग्रेस मधील पक्षश्रेष्ठीकडे दाद मागण्याचा निर्णय घेतला.काकासाहेब गाडगीळ,यशवंतराव चव्हाण,शंकरराव देव,नानासाहेब कुंटे यांना चर्चेसाठी दिल्लीला बोलविले.त्यापूर्वी यशवंतरावचव्हाण यांनी कराडला जाऊन कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमध्ये योगदान -

मुंबईसह महाराष्ट्राला कॉंग्रेसच्या नेत्यांचा विरोध होता.व्दैभाषिक राज्याला गाडगीळ,देव यांनी पाठिंबा दिल्याने यशवंतराव चव्हाण यांना पटले नाही.मात्र नेत्यांमध्ये फूट नको म्हणून त्यांनी विरोध केला नाही.२० व२१ ऑक्टोबरच्या महाराष्ट्र प्रदेशकॉंग्रेसच्या बैठकीत द्वैभाषिक राज्याच्या ठरावाला मंजूरी देण्यात आली. त्यावेळी नेत्यांमध्ये एकजूट दिसावी म्हणून यशवंतरावांनी त्या ठरावाला पाठिंबा दिला.द्वैभाषिक राज्याच्या निर्णयानंतर त्रिराज्य योजना कॉंग्रेसकडून मांडण्यात आली,यावेळी फार मोठ्या प्रमाणात विरोध झाला.महाराष्ट्रातील कॉंग्रेस च्यानेत्यांनी पक्ष श्रेष्ठींचे ऐकायचे नाही असे ठरविले मात्र यशवंतराव चव्हाण यांनी या निर्णयाला विरोध केला.पक्षाचा जो आदेश असेल तो आपण पाळणार असा निर्णय त्यांनी घेतला. द्वैभाषिक राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री बनले.त्यांचे नेतृत्व अधिक परिपक्व बनले.जनतेला विश्वासात

घेऊनद्वैभाषिक राज्याचे महत्व पटवून सांगण्याचा प्रयत्न केला.पक्षातीत राज्यकारभार चालविण्याचा प्रयत्न करून समता,बेकारी निवारण,उत्पादन वाढ इ.उद्दिष्टांची पूर्तता इतर पक्षाच्या मदतीने करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्यापुढे अनेक आव्हाने होती,ती अशी की,भाषिक वादामुळे निर्माण झालेली कटुता कमी करणे,भाषिक तत्वाचे सार मराठी व गुजराती लोकांना पटवून देणे,सौराष्ट्र,मुंबई,मराठवाडा अशा विविध राजवटीखाली असलेल्या प्रदेशांच्या कायद्यांचे एकत्रीकरण करणे,निपाणी,बेळगाव यांच्या सीमाबाबतचा प्रश्न सोडविणे अशा अडचणी त्यांच्यासमोर होत्या.सर्व प्रश्न त्यांनी संवेदनशीलतेने सोडविण्याचा प्रयत्न केला.

दुसऱ्या प्रश्नाबाबत त्यांनी अशी घोषणा केली की,एकभाषिक राज्याचे सर्व फायदे द्वैभाषिक राज्यात मिळतील.मराठी व गुजराती प्रादेशिक भाषा त्यात्या विभागात राज्यकारभाराच्या सर्व पातळयांवर चालू ठेवणे,मागास भागाचा विकास करणे,भाषा ,कला,संस्कृती यांना प्रोत्साहन देणे या कार्याला त्यांनी प्राधान्य दिले.

समारोप -

अशा प्रकारे द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी स्वतंत्र महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा असताना देखील उत्तमपणे कारभार केला, तो केवळ आपल्या पक्षाच्या भूमिकेचा आदर करण्यासाठी! याचा विसर आजच्या राजकारणी नेत्यांना नक्कीच पडलेला दिसतो.संयुक्त महाराष्ट्राच्या त्यांच्या मागणीला वैचारिक बैठक होती परंतु व्यावहारिक दृष्टीकोणातून ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पर्याय स्वीकारावा लागेल असे दिसून आले तेव्हा तो पर्याय त्यांनी स्वीकारला.आजच्या परिस्थितीचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा राजकारण,पक्ष नेते आणि कार्यकर्ते यांच्या निष्ठा वारंवार बदलताना दिसतात,राजकारणातून नीतीमत्ता हरवत चालली आहे.पक्षांतर तर वैशिष्टय बनले आहे.या पार्श्वभूमीवर विचार करताना यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श घेणे,त्यांच्या नेतृत्वाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.संयुक्त राज्याची निर्मिती हा त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा कळसाध्याय होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची मागणी त्यावेळी जोर धरून होती,त्याचदरम्यान राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल जाहीर झाला आणि त्यातव्दैभाषिक राज्याचा निर्णय घेण्यात आला,या भूमिकेला चव्हाण यांचा विरोध होता परंतू पक्षाची भूमिका आणि शिस्तपालन म्हणून त्यांनी या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली.

संदर्भ –

१ बेहरे -महाराष्ट्राचे मन,पृ.क्रं. ३९,४०

२ पेंडसे लालजी-महाराष्ट्राचे महामंथन,पृ.क्रं. ३९,४३

३ फडके य.दि.- लोकराज्य,पृ.क्रं. १४

४ फडकेय.दि.-लोकराज्य,पृ.क्रं. ७२

५ गोयल कुमार सुधीर- महाराष्ट्र राज्याची निर्मिती,पृ.क्रं.३

६ . जोशी रामभाऊ, यशवंतराव इतिहासाचे एक पान,पृष्ठ क्रं.८९.

७चव्हाणयशवंतराव,लोकराज्य- १ मार्च १९८५,पृ३६

८वाघमारे जनार्दन,व्यक्तिवलये,भूमी प्रकाशन,लातूर,पृष्ठ क्रं.५

९ चव्हाणयशवंतराव,सह्याद्रीचे वारे,पृष्ठ क्रं.१९५.

१० थोरात संभाजी बाबा-यशवंतरावचव्हाण- झुंजार नेतृत्वाचा शोध व बोध-पृष्ठ क्रं.४,५

११ शहा रमनलाल – आमचे नेते,पृष्ठ क्रं.१९